विद्याविकास
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.
स्वररंग
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
डॉ. संतोष परचुरे
संचालक

संदर्भ क्र. विविमं/२०२२–२३/२४२ दिनांक : १२/१२/२०२२

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
विद्यापीठ परिसरातील संबंधित शैक्षणिक विभाग, पुणे.

**विषय : नविन व भावी मतदारांना मतदार नोंदणीसाठी सुविधा उपलब्ध करणेबाबत...**
**संदर्भ : स्वीप–२०२२/प्र. क्र. ५७५/२२/३३ दिनांक १६ नोव्हेंबर २०२२ चे पत्र.**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, भारत निवडणूक आयोगाकडून भारतीय नागरीकांचे निवडणूक मतदार यादीमध्ये नावनोंदणी करण्याबाबत वार्षिक संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम आणि सतत अद्ययावत करण्याचा कार्यक्रम हे नियमितपणे व सातत्याने राबविण्यात येत असतात.

सदर कार्यक्रमांमध्ये नविन व भावी मतदारांच्या नावनोंदणीवर विशेष भर देण्यात येतो. याआधी येणाऱ्या वर्षामधील १ जानेवारी या अहर्ता दिनांकास १८ वर्षे पुर्ण करणाऱ्या नागरिकास मतदार यादीमध्ये नावनोंदणी करता येत होती. तथापी नावनोंदणी प्रक्रीयेमध्ये नुकत्याच झालेल्या बदलामुळे, आता येणाऱ्या वर्षामधील १ जानेवारी, १ एप्रिल, १ जुलै व दि. १ ऑक्टोबर रोजी या चार अर्हता दिनांकापैकी कोणत्याही एका दिनांकास १८ वर्षे वय पुर्ण झालेल्या नागरिकांना नविन वा भावी मतदार म्हणून नाव नोंदणी करता येणार आहे. यासाठी भारत निवडणूक आयोगाने पुढीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

अ) विद्यार्थ्यांना मतदार नाव नोंदणीसाठी प्रोत्साहन देण्यासाठी शैक्षणिक संस्थांनी त्यांच्या वेबसाईटवर “नवीन मतदार नावनोंदणी” साठी एक लिंक एका जनजागृतीच्या स्लोगन सह उपलब्ध करुन द्यावी. सदर लिंक अर्जदाराला NVSP पोर्टलवरती “नवीन मतदार नावनोंदणी” – फॉर्म ६ येथे निर्देशित करील.

आ) शैक्षणिक संस्थांनी त्यांच्या प्रवेश अर्ज व परिक्षा अर्जांमध्ये शेवटी “नवीन मतदारासाठी नावनोंदणी करीता अर्ज” अशा टॅगलाईन सह एक रकाना उपलब्ध करुन द्यावा. सदर टॅगलाईन ही NVSP पोर्टलशी हायपर लिंक करण्यात यावी. त्यामुळे त्यावर क्लिक केल्यावर, ती अर्जदाराला NVSP पोर्टलवरील “नवीन मतदार नावनोंदणी” – फॉर्म ६ येथे निर्देशित करील.

या संबंधीचे सविस्तर पत्र, आपल्या माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागांमध्ये आपण आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी, कळावे हि विनंती.

सोबत : वरिलप्रमाणे

डॉ. संतोष परचुरे
संचालक,
विद्यार्थी विकास मंडळ

भ्रमणध्वनी : ०९२७२७२७९९९, ०८२७५५१५३५४, ईमेल : sdparchure@gmail.com, bsd@unipune.ac.in
कार्यालय: ०२०–२५६२२६८०, ०२०–२५६२२६८७, संकेतस्थळ : http://www.unipune.ac.in/bsd

# मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

क्रमांक:- स्वीप-२०२२/प्र. क्र.५७५/२२/३३
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- १६ नोव्हेंबर, २०२२.

प्रति,

१) प्रधान सचिव,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई.

२) प्रधान सचिव,
कृषी विभाग,
मंत्रालय, मुंबई.

३) सचिव,
वैद्यकीय शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई.

विषय :- शैक्षणिक संस्थामधील नविन व भावी मतदारांना मतदार नोंदणीसाठी शैक्षणिक संस्थांमध्ये सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत ...

संदर्भ :- वरिष्ठ प्रधान सचिव, भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.२३/एईआरओ/ २०२२-ईआरएस, दि.०७.११.२०२२.

महोदय,

उपरोक्त विषयावरील भारत निवडणूक आयोगाच्या दि.०७.११.२०२२ रोजीच्या पत्राची प्रत सोबत जोडलेली आहे, ती कृपया पहावी.

२. भारत निवडणूक आयोगाकडून भारतीय नागरिकांचे निवडणूक मतदार यादीमध्ये नावनोंदणी करण्याबाबत वार्षिक संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम आणि सतत अद्ययावत करण्याचा कार्यक्रम हे नियमितपणे व सातत्याने राबविण्यात येत असतात. सदर कार्यक्रमांमध्ये नविन व भावी मतदारांच्या नावनोंदणीवर विशेष भर देण्यात येतो. याआधी, येणा-या वर्षामधील १ जानेवारी या अर्हता दिनांकास १८ वर्षे पुर्ण करणा-या नागरीकास मतदार यादीमध्ये नावनोंदणी करता येत होती. तथापि नावनोंदणी प्रक्रीयेमध्ये नुकत्याच झालेल्या बदलामूळे, आता येणा-या वर्षामधील १ जानेवारी, दि.१ एप्रिल, दि.१ जुलै व दि.१ ऑक्टोंबर रोजी या चार अर्हता दिनांकापैकी कोणत्याही एका दिनांकास १८ वर्षे वय पुर्ण झालेल्या नागरीकांना नविन वा भावी मतदार म्हणून नाव नोंदणी करता येणार आहे. सदर तरतुदीमुळे मोठया प्रमाणामध्ये भावी मतदारांना त्यांचे अगाऊ अर्ज सादर करता येणार आहे.

३. नविन व भावी मतदारांची मतदार यादीमध्ये नाव नोंदणी करण्याचे काम नेहमीच आव्हानात्मक असते. मतदार नोंदणीस प्रोत्साहन देण्याच्या भारत निवडणूक आयोगाच्या सतत विविध प्रयत्नांनंतरही, वर्षे १८ ते १९ या वयोगटातील युवकांचे मतदार नाव नोंदणीचे प्रमाण कमी आहे. तसेच असे बहुसंख्य भावी मतदार हे शैक्षणिक संस्थेचा भाग असल्यामुळे, शैक्षणिक संस्थाचा सक्रिय सहभाग घेऊन युवकांच्या /भावी मतदारांची नाव नोंदणी वाढविणे शक्य होईल असे भारत निवडणूक आयोगाला वाटते.

या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाने पुढीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत:-

अ) विदयार्थ्यांना मतदार नाव नोंदणीसाठी प्रोत्साहन देण्यासाठी शैक्षणिक संस्थांनी त्यांच्या वेबसाईटवर "नवीन मतदार नावनोंदणी " साठी एक लिंक एका जनजागृतीच्या स्लोगन सह उपलब्ध करुन द्यावी. सदर लिंक ही अर्जदाराला NVSP पोर्टलवरील "नवीन मतदार नावनोंदणी "- फॉर्म ६ येथे निर्देशित करील.

आ) शैक्षणिक संस्थांनी त्यांच्या प्रवेश अर्ज व परिक्षा अर्जामध्ये, शेवटी "नविन मतदार साठी नावनोंदणी करीता अर्ज " अशा टॅगलाईन सह एक रकाना उपलब्ध करुन द्यावा. सदर टॅगलाईन ही NVSP पोर्टलशी हायपर लिंक करण्यात यावी. त्यामुळे त्यावर क्लिक केल्यावर, ती अर्जदाराला NVSP पोर्टलवरील "नवीन मतदार नावनोंदणी "- फॉर्म ६ येथे निर्देशित करील.

४. यास्तव राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील नविन व भावी मतदारांना मतदार नोंदणीसाठी शैक्षणिक संस्थांमध्ये सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या वरील निदेशांनुसार, आपल्या विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विदयापिठे, महाविदयालये यांना कार्यवाही करण्याबाबत आपल्यास्तरावरुन कळविण्यात यावे, ही विनंती.

आपला,

(म.रा.पारकर)
उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी

प्रत,

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, सर्व जिल्हे.

204

**By Post/ Email**

# ELECTION COMMISSION OF INDIA

**NIRVACHAN SADAN, ASHOKA ROAD, NEW DELHI -110001**

No. 23/AERO/2022-ERS

Dated: 7th November, 2022

To,

The Chief Secretary/Administrator,
Of all States/UTs.

Subject: - **Facilitate the enrolment of prospective voters from the campuses of educational institutions -regarding.**

I am directed to refer to the subject cited above and to state that the electoral rolls are prepared and revised, subject to the overall superintendence, direction and control of the Election Commission of India under Article 324 of the Constitution, in accordance with the provisions of Representation of People Act, 1950 and Registration of Electors Rules, 1960.

2. The Election Commission of India has always been committed for conducting free, fair and inclusive election, for which an error free and updated electoral roll is prerequisite. The electoral roll is updated regularly through the Annual Summary Revision and continuous updation, wherein special focus is given on registration of new/prospective electors, who are/would be eligible for registration in electoral roll.

3. Earlier, the registration in electoral roll was done with respect to one qualifying date i.e. 1st January of the coming year, however with the recent change in registration process; provision of four qualifying dates have been introduced, i.e. 01st January, 01st April, 01st July and 01st October of the year in which the final publication of electoral roll is done. The said provisions have enabled the more number of prospective electors to submit advance application/claim for registration in Form-6, upon the draft publication of electoral roll, usually done in November every year.

4. The registration of new/prospective electors has always been a challenging task, and inspite of Commission's consistent efforts for encouraging and increasing the enrollment in 18-19 age group, there has always been a shortfall in the registration number. As majority of such prospective electors are part of the educational institutes, the Commission feels that registration of young/prospective electors can be maximized through active participation of education institutions by providing:-

(i) A dedicated space on institutions websites where a link for "registration of new voters" along with awareness slogans may be given, to encourage the students for their registration as electors; this link would direct the applicant to Form 6-"Registration of New Voter" on NVSP portal

(ii) A field embedded towards the end of registration/examination form with tagline **"application form to be a new voter"**. A click on the same would direct the applicant to Form 6-"Registration of New Voter" on NVSP portal, by hyper-linking the tagline with portal.

5. Further, I am also directed to convey that suitable instructions may also be issued to education Department/Boards to include the Electoral Literacy in Curricula, Co-Curricula and Extra curricula at the school level. This has also been taken up with the Union Ministry of Education, GOI and the Ministry has assured for necessary revision in the National Curriculum framework (NCF). You are, therefore, requested to devise necessary framework for the inclusion of Electoral Literacy in the school curriculum of your state, in consultation with the Chief Electoral Officer of the concerned state/UT.

6. Accordingly, it is requested to send suitable communications in this regard to educational department/universities/Boards falling under the purview of your State/UT to facilitate the enrolment of young/prospective electors in the electoral roll.

Yours faithfully,

(NARENDRA N. BUTOLIA)
SENIOR PRINCIPAL SECRETARY

Copy to: Chief Electoral Officers of all the States/UTs